# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# परिपत्रक क्र.२३६/२०२४

पुणे जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली असल्याने त्याचा परिणाम शालेय विद्यार्थी यांच्यावर होऊ नये या करिता मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी **पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा व सर्व महाविद्यालये** यांना गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी सुट्टी जाहीर केलेली आहे.

सदर पार्श्वभुमीवर पुणे जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये या करिता विद्यापीठ कार्यालयास दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे.

सर्व संबंधिताना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. सदर सुट्टी ही सन २०२४ मध्ये भरुन द्यावी लागणार असून त्याबाबत स्वतंत्र परिपत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

तथापि, विद्यापीठ आस्थापनेतील स्थावर विभाग, सुरक्षा विभाग व आरोग्य केंद्र हे विभाग अत्यावश्यक सेवा म्हणून सदर विभागांचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु राहील. सदर विभागातील संबंधितांना सदर दिवसाची पर्यायी रजा नंतर देय राहील. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी सबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी

**(प्रा.(डॉ.) अविनाश कुंभार)**
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जा.क्र. : एएन/३५७०
दिनांक : २६/०९/२०२४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा.

E:\Non-Teaching\2024\Circular\Holiday Circular 2024.docx